आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक.क्र.१५७०/४००
दि. १५/०१/२०२१

मा.सहाय्यक महापालिका आयुक्त
सर्व क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

विषय - वर्ड फ्ल्यूच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ - मा.जिल्हाधिकारी कार्यालयात दि.१३/१/२०२१ रोजी झालेली बैठक व मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेले आदेश.

महाराष्ट्र राज्यात वर्ड फ्ल्यूचा प्रादुर्भाव झाला असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने मा.जिल्हाधिकारी कार्यालयात दि.१३/१/२०२१ रोजी झालेली बैठक आयोजित करण्यात आली होती.

नागरिकांडून कावळे,कबुतरे,पारवे मृत झाल्याच्या तक्रारी येत आहेत.अशा परिस्थितीत सदर मृत पक्षांची तपासणी होणे आवश्यक असून पशु संवर्धन विभागाने रोग्य अन्वेषण केंद्र ब्रेमन चौक तसेच पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालय स्पायसर कॉलेजसमोर औंध पुणे.या ठिकाणी मृत पक्षी स्विकारण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

पुणे शहरातील नागरिकांना मृत पक्षी आढळून आल्यास १८०० १०३० २२२ हा टोल फ्री क्रमांक देण्यात आलेला असून सदर क्रमांकावर प्राप्त झालेल्या तक्रारी क्षेत्रिय कार्यालयाकडे वर्ग करण्यात येणार आहेत.आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीत मृत पक्षी आढळल्यास सदर मृत पक्षी उपरोक्त नमूद केलेल्या ठिकाणी पोहचविण्यास आपल्या अधिनस्थ विभागीय आरोग्य निरीक्षक,आरोग्य निरीक्षक,मोकादम यांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

मृत पक्षी गोळा करण्यासाठी ५० मायक्रोपेक्षा जास्त जाडीची प्लॅस्टिक बॅग उपयोगात आणावी तसेच सदर मृत पक्षी पाठविताना सादर करावयाचा फॉर्म सोबत जोडला आहे.

तरी आपल्या कार्यालयाकडे मृत पक्ष्यांच्या संबंधी तक्रार आल्यास उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.

कळावे,

रुबल अग्रवाल
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत
मा. उप आयुक्त
परिमंडळ १ ते ५
पुणे मनपा
यांजकडून माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर

Scanned by CamScanner

मा.सहाय्यक आयुक्त,
रोग अन्वेषक केंद्र,
पशु संवर्धन विभाग,
औंध,पुणे.

यांजकडेस ...

विषय - मृत पक्ष्यांची तपासणी करणेबाबत.
संदर्भ - आरोग्य खात्याकडे प्राप्त झालेली नागरिकांची तक्रार.

| अ.क्र. | दिनांक | मृत पक्षी आढळलेले ठिकाण | पक्ष्याचा प्रकार (कोंबडी,कावळा पारवा,कबुतर इ.) | मृत पक्ष्यांची संख्या | मृत पक्षी तपासणीसाठी दिलेला दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

नाव -
हुद्दा -
स्वाक्षरी -

मोबाईल क्रमांक -

Scanned by CamScanner